# आरोग्य सेवा संचालनालय

## (महाराष्ट्र राज्य)

" आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
|---|---|---|
| | २२६२१०३१-३५ | Website : http://maha-arogya.gov.in |
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६११४७१ | Email : miscell@rediffmail.com |
| सहसंचालक (प्रा.आ.केंद्र-जिपस्तर) | २२६२०२४० | Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२११८५ | 022- 22679044(Hosp.) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२६२८२ | 022-22622155(CAO) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६७५५ | 022-22703785(Control Room) |
| | | 022-22621047 (NCD) |
| | | 022-22625799(Procurement Cell) |

**आदेश**

क्र.संआसे/जन्म-मृत्यु/उपनिबंधक/कक्ष-२८/टे.३/न.क्र.३६/६८०
दिनांक - १० /०६/२०११

प्रति
१) जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णालय, ....................(सर्व)
२) वैद्यकिय अधिक्षक,
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, ..............(सर्व)
३) अधिक्षक,
स्त्री रुग्णालय, व प्रसूतीगृह..................(सर्व)

विषय - आरोग्य संस्थेत झालेल्या जन्म मृत्यु घटनेची नोंद करुन प्रमाणपत्र देणे वैद्यकिय अधिक्षक /अधिकारी यांना उपनिबंधक म्हणून प्राधिकृत करणेबाबत

संदर्भ - दि. ९ मार्च २०११ रोजी सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या बैठकीतील निर्णय

माता व बालक यांना संस्थेत मिळणाऱ्या इतर सेवाप्रमाणे जन्म प्रमाणपत्र संस्थेमार्फत त्वरित उपलब्ध व्हावे व दुबार जन्मनोंदणी टाळण्याच्या दृष्टीने प्रथम टप्प्यात सामान्य रुग्णालय, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व स्त्री रुग्णालय यांना उपनिबंधक जन्म व मृत्यु नेमण्याच्या सूचना मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी केलेल्या आहेत. दि. ९ मार्च २०११ रोजी मा. आयुक्त, कुटुंब कल्याण तथा अभियान, संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये याबाबत अंतिम निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्य निबंधक जन्म व मृत्यु तथा संचालक आरोग्य सेवा मुंबई यांना जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम ७(५) नुसार, प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन आपल्या संस्थेस १ जुलै २०११ पासून उपनिबंधक जन्म व मृत्यु कार्यालय असे घोषित करण्यात येत आहे. त्यानुसार आपल्या संस्थेतील व आपल्या अधिकारातील एका योग्य व्यक्तिची उपनिबंधक म्हणून नेमणूक करावी व त्याचा अहवाल उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु, राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी केंद्र, पुणे यांना ७ दिवसाच्या आत पाठवावा. सदर उपनिबंधकाना या कामासाठी कोणतेही अतिरिक्त वेतन व भत्ते अथवा मानधन अदा करण्यात येणार नाही.

सदर नमणुकी अन्वये उपनिबंधक, जन्म व मृत्यु याना जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या तरतुदीनुसार, जन्म अहवाल नमुना क्र १ भरुन त्यानंतर, जन्म प्रमाणपत्र नमुना क्र. ५ वितरीत करण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. परंतु मृत्यु प्रमाणपत्र वितरीत करण्याची व उपजत मृत्यु नोंदणीसंबधातील कार्यवाही निबंधक जन्म व मृत्यु यांचेकडूनच अपेक्षीत राहील. त्यामुळे मृत्यु अहवाल नमुना क्र.२, उपजतमृत्यु अहवाल नमुना क्र. ३ व मृत्यूच्या कारणाचे वैद्यकिय प्रमाणपत्र नमुना क्र. ४ पूर्वीप्रमाणेच निबंधक जन्म व मृत्यु यांचेकडे प्रचलित पध्दतीनुसार, सादर करणे अपेक्षीत राहील. यात बदल करण्यात आलेला नाही.

नियुक्त करण्यात आलेल्या सर्व उपनिबंधक यांना १ जुलै २०११ पूर्वी सविस्तर प्रशिक्षण व मार्गदर्शन उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु, राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी केंद्र, पुणे कार्यालयामार्फत करण्यात येईल. व त्याबाबतच्या स्वतंत्र सूचना उपसंचालक आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु, राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी केंद्र, पुणे यांचे कार्यालयामार्फत देण्यात येतील.

(स्वाक्षरी)

संचालक आरोग्य सेवा
तथा मुख्य निबंधक, जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :-

१) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म व मृत्यु, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म व मृत्यु, महानगरपालिका .................... (सर्व)
३) मुख्याधिकारी तथा निबंधक जन्म व मृत्यु, नगरपरिषद,
(बीड/भंडारा/बुलढाणा/चंद्रपूर/गडचिरोली/गोंदिया/हिंगोली/जालना/लातूर/नंदूरबार/उस्मानाबाद/परभणी/ रायगड/रत्नागिरी/सातारा/सिंधुदुर्ग/वर्धा/वाशिम/यवतमाळ)
४) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म व मृत्यु, जिल्हापरिषद, .................. (सर्व)
५) उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ ...... (सर्व)

प्रत पुढिल कार्यवाहीस्तव रवाना :- उपसंचालक, आरोग्य सेवा, (आमाजीआ), पुणे

प्रत सविनय सादर :- १) मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२) मा.आयुक्त कुटुंब कल्याण तथा अभियान संचालक,एनआर एच एम., मुंबई

राज्य आरोग्य माहिती व
जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय,
पुणे-४११ ००१

सत्यमेव जयते

बेटी बचाओ
save the girl child

उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य
नायडू हॉस्पिटल कंपाऊंड,पुणे-१

दूरध्वनी: ०२०-२६०५८७४७(वै.)
०२०-२६०५९५३०(का.)
फॅक्स : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल: crs_d83@yahoo.com


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/सेरोगेट मदर-जन्म नोंद/7843-55/२०११,दिनांक 16 सप्टेंबर २०११

प्रति,
कार्यकारी आरोग्य अधिकारी,
तथा निबंधक, जन्म व मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एफ दक्षिण विभाग, ३रा मजला
डॉ. बी.आर.आंबेडकर मार्ग,परेल, मुंबई -१२

विषय :- सेरोगेट मदर प्रकरणी जन्म नोंदणी करण्याबाबत....

संदर्भ :- आपले पत्र क्र. एचओ/२४९६०/नों.१/दि. १३.९.२०११

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, आपण सेरोगेट मदर प्रकरणातील बालकांच्या जन्म नोंदणी संदर्भात, या कार्यालयास संदर्भित पत्राद्वारे मार्गदर्शन मागितले आहे. IVF तंत्रज्ञान व सरोगसी या बाबत ICMR (Indian Council of Medical Research) यांनी कायदयाचा मसुदा तयार करुन केंद्र शासनास सन २०१० ला सादर केला आहे. सदर कायदा अद्यांप पारित झालेला नाही. तसेच सेरोगेट मदर प्रकरणी महानिबंधक जन्म - मृत्यु, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचना अद्याप प्राप्त नाहीत. नमूद प्रकरणात केवळ भारत सरकारचे मार्गदर्शन नाही म्हणून जन्म नोंद थांबविता येणार नाही. त्यामुळे आपण विचारलेल्या प्रकरणाच्या अनुषंगाने आपणास खालील प्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे -

१) केंद्रीय जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील तरतुदीप्रमाणे घटना घडतेसमयी उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे, प्रत्येक घटनेची नोंद होणे बंधनकारक आहे.

२) 'सेरोगसी' प्रकरणात जन्म नोंद अहवाल फॉर्म नं. १ हॉस्पिटलमार्फतच उपलब्ध होणे आवश्यक आहे.

३) 'सेरोगसी' संबंधातील वैद्यकिय कागदपत्रे, IVF तंत्रज्ञानाचा वापर करणारी संस्था यांची जबाबदारी राहणार असून कोणताही वाद अथवा न्यायालयीन वाद उपस्थित झाल्यास, याचा पूर्णपणे निपटारा करण्याची जबाबदारी कायदेशिर पालक (Commissioning Parents) व IVF तंत्रज्ञानाचा वापर करणारी संस्था यांची राहणार आहे. हॉस्पिटलकडून जन्म घटनेची नोंद घेण्याची जबाबदारी निबंधकांची आहे. व त्यास अनुसरुन प्रमाणपत्र अदा करण्याची जबाबदारी निबंधकांची आहे.

४) हॉस्पिटल मार्फत नोंद निबंधकाकडे पाठविताना वडिलांचे नाव व आईचे नाव या रकान्यात फक्त अनुवंशिक माता व पिता (Genetic Mother & Father) यांचीच नावे येणे बंधनकारक आहे.

५) सांख्यिकी भागात अ.क्र.१६ ते २० मधील माहिती सेरोगेट मदर अथवा प्रसूत होणाऱ्या मातेच्या बाबतीत लिहावी प्रसुतीचा प्रकार या ठिकाणी सरोगसी नमूद करुन प्रसुतीचा प्रकार नमूद करावा. उपरोक्त पध्दतीने हॉस्पिटलने नोंद निबंधक (जन्म-मृत्यु) यांचेकडे पाठवावी.

६) निबंधकाने नोंद करुन प्रमाणपत्र अदा करावे. ICMR यांच्या मसुदयातील कलम ३४ मधील उपकलम (१०) मधील सुचनानुसार जन्म प्रमाणपत्रामध्ये कायदेशिर पालकांचे नाव नमूद करण्याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे एकेरी पालकांच्या बाबतीत त्यांचे नाव आई अथवा वडिल जे लागू असेल ते आई अथवा वडिल यांच्या रकान्यात लिहून दुसरे नाव 'Not known' 'माहिती नाही' लिहून प्रमाणपत्र अदा करावे. केंद्र शासनाच्या जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या अधिनियमानुसार प्रत्येक घटनेची नोंद होणे बंधनकारक आहे व त्यानुसार प्रमाणपत्र वितरण होणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा .

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे -१

प्रत सविनय सादर :- मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य
डॉ.नायडू रुग्णालय आवार,पुणे १
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६०५८७४७ (वै)
०२०-२६०५५५३० (का)
फॅक्स क्रमांक ०२०-२६०५८२९२
तार जन्ममृत्यु
इ-मेल sbhivs@pn3.vsnl.net.in

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/जन्म दाखला/ ९८९२-९४ /१०,दिनांक १७/१८ फेब्रुवारी २०१०

प्रति,
आरोग्याधिकारी तथा
निबंधक, जन्म व मृत्यु,
कल्याण-डोंबिली महानगरपालिका,
जि. ठाणे

विषय :- सेरोगेट मदर प्रकरणी...

संदर्भ :- आपले पत्र क्र. कडोंमपा/आवि/मुका/जन्म मृत्यु/९९
दि. ३/२/२०१०

उपरोक्त विषयांतर्गत संदर्भीय पत्र व सहपत्रास अनुसरुन आपणास पुढील प्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे -

१) आपल्या उपरोक्त संदर्भिय पत्र व सहपत्रामध्ये श्री. दिलीप अहूजा यांचा अर्ज जोडण्यात आलेला नाही.

२) सोबतच्या वैद्यकिय अहवालाची सहपत्रे प्राप्त झालेली असून त्यासोबत Indian Council of Medical Research यांचा मान्यतेसाठी पाठविलेला Draft प्राप्त झाला.

३) भारत सरकारने अद्यापही सरोगेट प्रकरणात जन्म नोंद घेण्याबाबत कोणताही ठोस मार्गदर्शन पत्र अद्यापही पाठविलेलें नाही.

४) नमूद प्रकरणात केवळ भारत सरकारचे मार्गदर्शन उपलब्ध नाही म्हणून जन्म नोंद थांबविता येणार नाही.

५) सदर प्रकरणात जन्म नोंद हॉस्पिटलकडून प्राप्त होणे आवश्यक आहे.

६) हॉस्पिटलकडे सरोगेट बाबत सर्व कागदपत्र व संबंधितामधील करारनामा उपलब्ध असतो त्यावरुन त्याची खात्री करुन घेऊन त्यांनी पुढील कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

F:\83\Serrogated Child.doc

७) हॉस्पिटलने निबंधकाकडे नोंद पाठविताना मूळ आई व वडिलांचे नाव (Genetic Mother & Father) लिहून सदर नोंद पाठविणे आवश्यक आहे. फक्त Remark रकान्यात Soragate Case म्हणून उल्लेख करावा.

८) सरोगेट प्रकरणात वैद्यकिय कागदपत्रे व संबंधितातील करारनामा जतन करुन ठेवण्याची जबाबदारी संबंधित हॉस्पिटलची राहणार आहे. व कोणतीही वैद्यकिय अथवा न्यायालयीन वाद उत्पन्न झाल्यास त्याच पूर्णपणे निपटारा करण्याची जबादारी मुलाचे आई वडिल (Genetic Mother & Father) व हॉस्पिटल यांची राहणार आहे. केवळ संबंधित हॉस्पिटलकडून प्राप्त जन्म घटनेची नोंद घेण्याची जबाबदारी निबंधकाची असून त्यांनी पाठविलेल्या माहितीनुसार नोंद घेवून त्यास अनुसरुन जन्म प्रमाणपत्र अदा करण्याची जबाबदारी संबंधित निबंधकाची आहे याची नोंद घ्यावी.

९) हॉस्पिटलने सदर जन्माबाबतची मूळ फाईल व रेकॉर्ड जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन सदर प्रकरणाबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास अथवा प्रकरण न्यायालयात गेल्यास मूळ कागदपत्रे न्यायालयास सादर करता येतील.

१०) सदर जन्मनोंद हॉस्पिटलकडून प्राप्त झाल्यावर नोंदवहीत सोरोगेट प्रकरण असे शेरा रकान्यात लिहणे आवश्यक आहे. मात्र जन्म प्रमाणपत्रात सरोगेट उल्लेख होता कामा नये. व ही नोंद हॉस्पिटल मार्फतच येणे आवश्यक आहे.

११) भारत सरकारच्या सरोगेट प्रकरणी मार्गदर्शक सूचना प्राप्त होईपर्यंत वरील प्रमाणे जन्म नोंदणीबाबत कार्यप्रणाली नुसार जन्मनोंदी करण्यात याव्यात. भारत सरकारच्या जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ नुसार प्रत्येक घटनेची नोंद होणे व त्यानुसार प्रमाणपत्र अदा करणे कायदयाने बंधनकारक आहे.

17/2/02

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहितीसाठी :- जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म व मृत्यु,जिल्हा परिषद,ठाणे
प्रत सादर :- मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,महाराष्ट्र राज्य,मुंबई

F:\83\Serrogated Child.doc

# महाराष्ट्र शासन

जमृवि- १३९१/३००/
क्रमांक:- सीआर-१८/कु.क.३
सार्वजनिक आरोग्य विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ०७ डिसेंबर, १९९२.

प्रती,

उपसंचालक
आरोग्य सेवा, ( आमाजीआ ),
पुणे.

विषय :- जन्म-मृत्यू नोंदणी बाबत आकारण्यात येणारी रक्कम कोणत्या लेखाशीर्षकाखाली जमा करावी याबाबत........................

संदर्भ :- आपले क्र.आमाजीआ/कक्ष-८३/१०२६-२७/९१, दिनांक २८ जानेवारी, १९९१, २० जुन, १९९१ व २१ सप्टेंबर, १९९२ ची पत्रे.

संदर्भीय प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, जन्म-मृत्यू नोंदणी बाबत आकारण्यात येणारी रक्कम खाली नमूद केलेल्या लेख शीर्षाखाली जमा करण्यात यावी.

"००३० - मुद्रांक व नोंदणी फी
८०० - इतर जमा रकमा
०६ - जन्म-मृत्यू व निरनिराळ्या विवाह अधिनियमान्वये वसूल केलेली फी"

जा.क्र. MIVS/कक्ष१८२०/६२/९२/३/४/१९९३

- स्वाक्षरीत -
( हु. चां. पठाण )
कार्यासन अधिकारी

Ishwar_desktop_newly app registrar_pariptrake letter

✓ सहीचे पान नाही.

आरोग्य सेवा
==========
परिपत्रक
======

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/ १७२९८-१७३२८/९०,
उपसंचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालय,
राज्य आरोग्य माहिती व जीवन विषयक आकडेवारी केंद्र,
कॅनॉट हाऊस, पहिला मजला, आयकर भवनामागे, पुणे -१.
दिनांक : १ जानेवारी, १९९१.

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी व
जिल्हा निबंधक जन्म मृत्यू,
जिल्हा परिषद - ________

विषय : जन्म मृत्यू नोंदणी अधि. नियम, १९६९ व तदअंतर्गत
===== महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, १९७६ मधील
तरतूदीं बद्दलचे स्पष्टीकरण..

वरील अधिनियम व नियमावलीमधील कांही तरतूदीं बाबत व कांहींच्या बाबत अधिक माहितीची विचारणा जिल्हा निबंधक, गट विकास अधिकारी व निबंधक यांचे कडून होत असते. आता पर्यंत वेळोवेळी स्पष्टीकरणे सर्वसंबंधीतांना या पूर्वीच कळवीले आहेत. खालील कांही सर्वसाधारण मुद्याबाबत स्पष्टीकरण दिले आहे.

मुद्दा :- कायदा कलम १३[३] व नियम १०[३] नुसार करण्यांत येणारी उशीरा नोंदणी
====

स्पष्टीकरण [अ] जन्म मृत्यू नोंदणीस एक वर्षापेक्षा जास्तकाळ उशीर झाला असल्यास अशा उशीरा घटनांची नोंदणी सध्याच्या आदेशानुसार कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१/ न्याय दंडाधिकारी वर्ग-१ यांच्या खास आदेशावरून व विलंब शुल्क रू.५ भरुन सध्या नोंदणी करता येते.

[ब] एका वर्षापेक्षा जास्त उशीरा म्हणजेच १९९० साली १९८८ पासून मागील कुठल्याही वर्षाची घटना उदा. १९१०, १९३५ अथवा १९५९ इत्यादी सालातील सुध्दा सदर उशीरा नोंदणीसाठी मागील घटनांची सत्यता पडताळून आदेश देण्याचा अधिकारी कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१ / न्याय दंडाधिकारी वर्ग-१ यांना आहे. [महारजिस्ट्रार, भारत सरकार, गृहमंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १/१/१९८५ जिवनांक [समन्वय] दिनांक १०/९/१९८५]

[क] वरील प्रमाणे उशीरा नोंदणी करतांना निबंधकांनी ज्या महिन्यामध्ये आदेश झाला आहे त्या महिन्याच्या जन्म/मृत्यू रजिष्टर मध्ये नोंद घेतांना अशा उशीरा घटनांच्या नोंदीत अनुक्रमांक देऊ नये व त्या नांवासमोर "उशीरा नोंद" असे स्पष्टपणे लिहावे. जर अनुक्रमांक दिले गेले तर त्या महिन्यात ती घटना घडली नसतांनाही ती घडली आहे असे अनुक्रमांकावरून दिसून येईल. या मुळे त्या गावाचा जन्म/मृत्यू दर वाढलेला दिसण्याची शक्यता आहे. शक्यतो उशीरा नोंदी ज्या त्या महिन्यात नोंद करण्यात आलेल्या घटनांच्या शेवटी लिहिण्यात याव्यात.

(९३)

[ड] महाराष्ट्र राज्यातील उपविभागीय दंडाधिकारी [महसूल] हे वर्ग-१ चे अधिकारी आहेत पण त्यांना कार्यकारी दंडाधिकारी वर्ग-१ याच पदाचे अथवा इतर कार्यकारी दंडाधिकारी यांनी आदेश देण्या बाबतचा मुद्दा राज्य व केंद्र शासनाच्या विचाराधीन असून या बाबत शासकीय आदेश प्राप्त होताच सर्व संबंधीतांना कळविण्यात येईल.

मुद्दा [२] :- कलम १५ व नियम ११ नुसार जन्म / मृत्यू नोंदणीमधील दुरुस्ता अथवा नोंदणी रद्द करणे.

स्पष्टीकरण – जन्म / मृत्यू रजिस्टर मधील कुठल्याही रकान्यांत भरलेली माहिती खाडाखोड करुन रद्द करु नये. ज्या ठिकाणी माहिती सुधारित स्वरुपांत द्यावयाची आहे त्या ठिकाणच्या माहितीस तांबडया शाईने गोल वर्तुळ करुन योग्य ती दुरुस्ती करावी अथवा रद्द केल्याचे शेरा रकान्यांत लिहून निबंधकांनी सही करावी व तारीख लिहावे. चुकीच्या दुरुस्तीचे सर्व अधिकार केवळ जन्म मृत्यू निबंधकासच आहेत. न्याय दंडाधिकारी या बाबत आदेश देण्यास सक्षम प्राधिकारी नाहीत.

मुद्दा क्र. [३] कलम ३२ व नियम १९ नुसार जन्म मृत्यूची रजिस्टरे कोठे ठेवावीत.

स्पष्टीकरण [अ] जन्म मृत्यूची रजिस्टरे वैधानिक कायम स्वरुपाचे रेकार्ड असून ते परत परत लिहून ठेवता येत नाही. मूळ रजिस्टर कायम स्वरुपांत जतन करणे अत्यंत जरुर आहे.

[ब] ग्रामीण भागातील निबंधकानी सध्याच्या वर्षाच्या मागील दोन वर्षा पूर्वीचे रजिस्टर गट विकास अधिकारी यांचे कडे कायमचे रेकॉर्ड म्हणून जमा करावीत.

[क] तसेच जन्म मृत्यूच्या दाखला वरील प्रमाणे ज्यांच्या ताब्यात आहेत त्यांनी जन्म/मृत्यू दाखला दिला पाहिजे.

मुद्दा क्र. [४] एखादा माणूस / स्त्री वाहून गेल्यास बेपत्ता झाल्यास अशा घटनांची नोंदणी.

स्पष्टीकरण – फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ नुसार एखादा माणूस/स्त्री चा किमान सात वर्षापर्यंत ठाव ठिकाण हातात नसल्यास ती घडल्या पासून ७ वर्षानी संबंधीत घर प्रमुख/पोलीस इ. यांच्या माहितीवर आधारीत मृत म्हणून [संबंधीत माणूस स्वत: हजर होई पर्यंत] नोंद करावी.

मुद्दा क्र. [५]: अनौरस अपत्य

स्पष्टीकरण :– अनौरस अपत्याची जन्म / मृत्यू नोंद करतांना जर आई आणि स्वतःला वडिल म्हणून घेणा-या व्यक्तिने दोघांच्या सम्मतीने आई वडिल म्हणून नांव नोंदविण्यास अनुमती दिली तर दोघांचे नांव नोंदवावे अथवा नैसर्गीक आईची सम्मती असल्यास तिचे नांव आईचे रकान्यात लिहावे.

महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

सत्यमेव जयते

उपसंचालक आरोग्य सेवा
(आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य

संकेतस्थळ – arogya.maharashtra.gov.in
कार्यालय ☎ :- ०२० – २६०५९५३०
कायदा विभाग ☎ :- ०२० – २६०५८६१०
नानोप विभाग ☎ :- ०२० – २६०५८२९२
ई-मेल crs_d83@yahoo.com

**परिपत्रक**
**महत्वाचे**

जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/विधवेचे वय व संपर्काचा तपशिल/ 11618-112055 /१९
दिनांक:- 96/11 /२०१९

प्रति,
१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यू, जिल्हा परिषद ..............(सर्व)
२) वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु, महानगरपालिका,.....(सर्व)
३) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
४) मुख्याधिकारी तथा निबंधक, जन्म व मृत्यु, नगरपरिषद/नगरपालिका/नगरपंचायत.........(सर्व)
५) व्यवस्थापक, कॅन्टोंमेंट बोर्ड, ......(सर्व)

विषय :- **मृत व्यक्तिच्या मृत्यू प्रमाणपत्रात त्यांच्या पतीचे/पत्नीचे (विधवेचे) वय व संपर्काचा तपशिल समाविष्ट करणेबाबत.**

**संदर्भ –** सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प.क्रं.संकीर्ण-२०१८/ प.क्रं.२०९/कु.क., दिनांक ०५/१०/२०१९.

उपरोक्त विषयासंबंधी संदर्भिय पत्रानुसार मृत व्यक्तीच्या मृत्यू प्रमाणपत्रात पतीचे/पत्नीचे (विधवेचे) नाव, वय व संपर्काचा तपशिलाबाबत राज्य शासनाने अधिसूचना दिनांक १७/०९/२०१९ रोजी निर्गमित केली असून, ती सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाली आहे. ही अधिसूचना आपल्या माहितीसाठी सोबत जोडून पाठवित आहोत.

सदर अधिसूचना केवळ आपल्या माहितीस्तव असून, ज्यावेळेस मृत्यू अहवाल (नमुना क्रं.२) मध्ये या मुद्दयाचा समावेश होईल त्यावेळेस त्या मुद्दयाची माहिती इतर मुद्दयांसोबत भरण्यात यावी. याबाबत आपल्या कार्यक्षेत्रातील शहरी व ग्रामिण भागातील निबंधक यांना कळवावे.

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत सविनय सादर :
१) मा.संचालक, जनगणना कार्यालय, मुंबई.
२) मा.संचालक आरोग्य सेवा-१ तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यू, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) मा.संचालक, आरोग्य सेवा-२ मध्यवर्ती इमारत, पुणे-१.

प्रत सस्नेह –
उपसंचालक आरोग्य सेवा, परिमंडळे... (सर्व)

*F:83/Circular.2019*

उपसंचालक आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ.) पुणे
दिनांक 16 NOV 19
जावक क्र. 11618-112055
सही :-

जन्म - मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८ वा) याचे कलम ३० (१) (२) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) नियम,२०१९ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. संकीर्ण २०१८/ प्र.क्र.२०९/ कु.क., दि.१७.९.२०१९ ची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-चार - ब, सप्टेंबर १९-२५,२०१९/भाद्र-२८ आश्विन ५, शके १९४१ च्या शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली असून त्याची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र .२०९/ कु.क.
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ०००१
ई मेल : ujwala.ransing @nic.in
दि. ०५/१०/२०१९

अधिसूचनेची मराठी व इंग्रजी प्रत माहिती व योग्य तया कार्यवाहीसाठी अग्रेषित,

आपला विश्वासू,

(ज.स.तडवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

उपसंचालक
आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ.)
आवक क्र. : 6010
दिनांक 19 OCT 2019
अधिक्षक
प्रशासकिय अधिकारी उपसंचालक

सोबत :- अधिसूचना

प्रत -

१) मा. राज्यपालांचे सचिव, मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) संचालक, व आयुक्त आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण) महाराष्ट्र राज्य, पुणे



30/10/2019

१४) संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

१५) सचिव, केंद्र शासन स्वास्थ व कुटुंब कल्याण मंत्रालय, (कुटुंब कल्याण विभाग) निर्माण भवन, नवी-दिल्ली,

१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (या अधिसूचनेस व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह)

१७) संचालक, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद, नवी दिल्ली

१८) अध्यक्ष, राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य

१९) सचिव व आयुक्त (कु.क.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई

२०) सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव यांचे स्वीय सहाय्यक,

२१) विभागीय आयुक्त (सर्व)

२२) जिल्हा पोलीस अधिक्षक (सर्व)

२३) सर्व जिल्हाधिकारी (त्यांच्या अख्यात्यारितील सर्व अधिकाऱ्यांना कळविण्याच्या विनंतीसह)

२४) उपसंचालक/सहसंचालक आरोग्य सेवा, (सर्व) पुणे

२५) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)

२६) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

२७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)

२८) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) तथा अतिरिक्त जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू (सर्व)

२९) सर्व आयुक्त, महानगरपालिका (त्यांच्या अखत्यारितील सर्व अधिकाऱ्यांना कळविण्याच्या विनंतीसह)

३०) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यू, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

३१) कार्यकारी अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यू कॅन्टोन्मेंअ बोर्ड (सर्व)

३२) निबंधक, जन्म-मृत्यू, प्रशासक तथा ॲम्युनिशन फॅक्टरी (सर्व)

३३) तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, तालुका (सर्व)

३४) मुख्याधिकारी, नगरपालिका/नगर पंचायत (सर्व)

३५) निवडनस्ती कु.क.

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

10th Floor, B Wing, G. T. Hospital Complex Building,
New Mantralaya, Mumbai 400 001, dated 17th September 2019

*NOTIFICATION*

REGISTRATION OF BIRTHS AND DEATHS ACT, 1969.

No. MIS. 2018/C.R.209/F.W.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 30 of the Registration of Births and Deaths Act, 1969 (18 of 1969) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, with the approval of the central Government, hereby makes the following rules, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Registration of Births and Deaths (------*----- Amendment) Rules, 2019.

2. In Form 2 appended to the Maharashtra Registration of Births and Deaths Rules, 2000 (hereinafter referred to as "the principal Rules), for entry 5a, the following shall be substituted, namely :—

"5-A. Full name of Husband/Wife : -------------------------------------------------- Age ----------------

permanent address of Husband/Wife: --------------------------------------------------

UID No. of Husband/Wife (if any)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

3. In Form 6 appended to principal Rules, for the words

"पती/पत्नीचे पूर्ण नाव : --------------------------------------------------

Full Name of Husband/Wife : -------------------------------------------------- the

following shall be substituted, namely :—

"पती/पत्नीचे पूर्ण नाव / Full name of Husband/Wife --------------------------------------------------

वय/Age : --------------------

पती/पत्नी यांचा कायमचा पत्ता / Permanent address of Husband/Wife --------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

4. In Form 8 appended to the principal Rules, for entry 5a-A, the following shall be substituted namely :—

"5-A. Full name of Husband/Wife -------------------------------------------------- Age --------------------

Permanent address of Husband/Wife : --------------------------------------------------------------------

UID No. of Husband/Wife (if any)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VARSHA M. BHAROSE,
Deputy Secretary to Government.

## सार्वजनिक आरोग्य विभाग

नवीन मंत्रालय, १० वा मजला, गो. ते. रुग्णालय आवार,
मुंबई ४०० ००१, दिनांक १७ सप्टेंबर २०१९

### अधिसूचना

**जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९.**

क्रमांक संकिर्ण. २०१८/प्र.क्र.२०९/कु.क.—जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ (१९६९ चा १८ वा) याचे कलम ३० (१) व (२) नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन केंद्र शासनाच्या सहमतीने खालीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) नियम, २०१९ असे म्हणण्यात येईल.

२. महाराष्ट्र जन्म-मृत्यू नियम, २००० (यापुढे " मुख्य नियम " असे संदर्भिण्यात येईल) सोबत जोडलेल्या फॉर्म २ मध्ये ५ (अ) चा समावेश करण्यात येईल :—

५अ-पती/पत्नी संपूर्ण नाव ........................................................ वय ............................

पती/पत्नी यांचा कायमचा पत्ता ........................................................................................

पती/पत्नी यांचा आधार क्रमांक (असल्यास)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

३. मुख्य नियमातील फॉर्म ६ मध्ये, खालील

पती/पत्नीचे पूर्ण नाव ........................................................

या एेवजी

पती/पत्नीचे पूर्ण नाव ........................................................ वय ............................

पती/पत्नीचा कायमचा पत्ता ........................................................................ असे समाविष्ट करण्यात येत आहे.

४. मुख्य नियमातील फॉर्म ८ मधील ५अ मध्ये खालील बाब समाविष्ट करावी.

५अ-पती/पत्नी यांचे संपूर्ण नाव ........................................................ वय ............................

पती/पत्नी यांचा कायमचा पत्ता ........................................................................................

पती/पत्नी यांचा आधार क्रमांक (असल्यास)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वर्षा मुं भरोसे,**
शासनाचे उप सचिव.

(५८) (४३)

ग्राम पंचायतमार्फत जन्म, मृत्यू
आणि विवाह नोंदणी.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक-व्हीपीएम्-२६६९-४०५५७-ई,
सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १९ जानेवारी १९७०

पहा:- (१) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांक-व्हीपीएम्-२६६८-३०३९०-ई, दिनांक २१ डिसेंबर १९६८.
(२) जिल्हाधिकारी, अकोला यांचे क्रमांक-२०८०-अ-१ (२)-६९, दिनांक २२ सप्टेंबर १९६९ चे पत्र.

## प रि प त्र क

शासन निर्णय क्रमांक-व्हीपीएम्-२६६८-३०३९०-ई, दिनांक २१ डिसेंबर १९६८ अन्वये खेड्यांतील जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणीचे काम पूर्वी तलाठी, पोलीस पाटील यांचे मार्फत होत असे. ते काम त्यांच्याकडून काढून दिनांक १ एप्रिल १९६९ पासून ग्राम पंचायतीकडे सोपविण्यांत आले. जन्म, मृत्यू व विवाह यासंबंधीचे दिनांक १ एप्रिल १९६९ पूर्वीचे रेकॉर्ड पंचायतीकडे द्यावयाचे किंवा कसे असा प्रश्न उपस्थित झाला आहे. याबाबत शासन आदेश देत आहे कीं, दिनांक १ एप्रिल १९६९ पूर्वीचे रेकॉर्ड तहशील कार्यालयांतच ठेवण्यांत यावे. दिनांक १ एप्रिल १९६९ पासूनचे रेकॉर्ड ग्रामपंचायत कार्यालयात राहील.

२. हे परिपत्रक महसूल व वन विभागाशी सल्लामसलत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

द. वि. साळरकर,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग.

प्रत -

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,

शाम्मु-रोटा-एव्ह-११८६(१०००-१-७०)

(कृ. मा. प.)

मुद्दा क्र.५ ९०१९(

जन्म-मृत्युच्या कूळ नोंदी (

(उदा. पूर येणे, आग (

.जिल्हाधिकारीकडील नोंदवह्या (

या बाबत द्यावयाच्या

| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **आरोग्य सेवा संचालनालय**<br>(महाराष्ट्र राज्य)<br>"आरोग्य भवन" सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,<br>बीपी.डिमेलो रोड मुंबई - ४०० ००१ | |

| | | |
|---|---|---|
| कार्यालय<br>संचालक (वैयक्तिक) | दूरध्वनी<br>(०२२)२२६२१०३१-३६<br>(०२२)२२६२१००६ | Website : http://maha-arogya.gov.in<br>Email : dhs_2005@rediffmail.com<br>Email: miscell@rediffmail.com<br>Fax : (022) 22621034 / 22620234 (DHS) |
| | | क्र.संआसे /जन्म-मृत्यु / कक्ष-१८/12967-13032/१७<br>दिनांक :- 11/22/09/2017 |


प्रति,
१) जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक, जन्म-मृत्यू,
जिल्हा परिषद, ......... (सर्व)
२) आरोग्याधिकारी
तथा निबंधक, जन्म-मृत्यू,
महानगरपालिका, ........ (सर्व)
३) कार्यकारी आरोग्य अधिकारी
तथा निबंधक, जन्म-मृत्यू,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
एफ साऊथ वार्डस, परळ, मुंबई.

विषय - मृत्यू नोंदणीसाठी आधारकार्ड आवश्यक असल्याबाबत.

संदर्भ - १) अवर सचिव, सार्वजनिक आरोगय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रं.जमृनों/२०१७/१३००/प्र.क्रं.४६९/कुक, दिनांक १८/०८/२०१७.
२) महानिबंधक जन्म-मृत्यू नोंदणी केंद्रिय गृह मंत्रालय यांची अधिसूचना क्रं. १/१२/२०१४/व्हीएस-सीआरएस, नवी-दिल्ली, दि.०४/०८/२०१७.

राज्यात जन्म-मृत्यु नोंदणी केंद्र शासनाच्या जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी नियम २००० अन्वये करण्यात येते.

राज्यात सन २०१६ पासून ग्रामिण व शहरी भागात केंद्र शासनाची संगणक प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे. त्याच सोबत संगणक प्रणाली मध्ये जन्म-मृत्युची घटनाही आधार क्रमांकाशी जोडण्यात येणार असल्याबाबत यापूर्वीच सर्व जिल्हा निबंधकांना या कार्यालयाच्या दिनांक २५/११/२०१४ च्या तसेच दिनांक १३/०५/२०१५ च्या परिपत्रकामध्ये मार्गदर्शन करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे उपरोक्त विषयाबाबत मा.अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भ क्रं.१ व महानिबंधक, भारत सरकार, नवी-दिल्ली यांचे संदर्भ क्रं.२ च्या अधिसूचने मध्ये नमुद केल्याप्रमाणे दिनांक १ ऑक्टोबर २०१७ पासून मृत्यू पावलेल्या व्यक्तीची मृत्यू नोंदणीसाठी खात्रीशीर ओळख प्रस्तावित करण्याच्या दृष्टीने आधार क्रमांक आवश्यक करण्यात आला आहे.

जर अर्जदाराकडे मृत व्यक्तीचा आधार नोंदणी क्रमांक (EID) उपलब्ध नसल्यास अर्जदाराच्या त्याच्या/तिच्या माहिती नुसार मृत व्यक्तीचा आधार क्रमांक उपलब्ध नसल्याबाबतचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. जर अर्जदाराने सादर केलेले प्रमाणपत्र खोटे आढळल्यास आधार अधिनियम २०१६ व जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील तरतुदीनुसार गुन्हा ठरु शकतो असे संबंधिताना सुचित करावे.

